ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ — पुणें, बुधवार तारीख ६ जून, १९५१ — अंक २३

## विविध माहिती

**पाकिस्तानमधील रबरी बुटांचा कारखाना**—डाक्कयाजवळील तेजगांव येथें रबराचे बूट तयार करण्याचा एक कारखाना आहे. सध्यां ह्या कारखान्यांत रोज १,८०० बुटांच्या जोड्या तयार होतात. लवकरच रोज ३,५०० बुटांच्या जोड्या तयार होऊं लागतील. कारखान्याचें उत्पादन पूर्ण होऊं लागल्यावर रोजीं १०,००० जोड्या तयार होतील. नंतर गम बूट्स आणि रेन कोट्सहि तयार करण्यांत येऊं लागतील.

**संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या १,००० शिष्यवृत्त्या**—उच्च शिक्षण आणि तांत्रिक विषयांचें शिक्षण देण्यासाठीं संयुक्त राष्ट्रसंघटनेतर्फें ह्या वर्षी १,००० शिष्यवृत्त्या देण्यांत येणार आहेत. ५० शिष्यवृत्त्या संघटनेच्या संस्कृतिक विभागातर्फें देण्यांत येतील. मागासलेल्या देशांना तांत्रिक मदत देण्याचे जे प्रयत्न संघटनेतर्फें करण्यांत येत आहेत, त्यांतच ह्या शिष्यवृत्त्यांचाहि अंतर्भाव आहे. ब्रह्मदेश, भारत व अतिपूर्वेकडील देश ह्यांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्यांचा फायदा घेतां येईल.

**सरदार पटेलांचें स्मारक**—भारतांतील उद्योगपतींनीं जून अखेर सरदार पटेल ह्यांच्या स्मारकासाठीं १ कोटी रुपये जमविण्याचें ठरविलें आहे. त्यापैकीं २७ लाख रुपये कापड गिरणी मालकांनीं जमविण्याचें कबूल केलें आहे. ह्या स्मारक फंडाची रक्कम शाळा, खेडेगांवांना जोडणारे रस्ते व विहिरी बांधण्यासाठीं खर्च करण्यांत येणार आहेत. एकूण रकमेपैकीं ८५ टक्के रक्कम ज्या भागांतून ती जमा झाली असेल त्या भागांतच खर्चिली जाईल. बाकीची १५ टक्के रक्कम ज्या मागासलेल्या भागांत वर्गणी जमा होणार नाहीं तेथें खर्च केली जाईल.

**लंडनमध्यें भारतीय चित्रपट**—फिल्म सोसायटी ऑफ इंडिअन लीग ह्या संस्थेतर्फें ‘आग’ हा हिंदी चित्रपट लंडनमध्यें नुकताच दाखविण्यांत आला. चित्रपट लंडनमधील प्रेक्षकांना आवडला. चित्रपटाचें कथानक आधुनिक पद्धतीचें आहे; आणि त्यांत नर्गीस, राजकपूर व प्रेमनाथ ह्या प्रसिद्ध नटनटींनीं कामें केलेलीं आहेत. चित्रपटाचे संवाद हिंदुस्थानींत आहेत, त्याऐवजीं ते इंग्लिशमध्यें घातल्यास चित्रपट फारच लोकप्रिय होईल असें म्हणतात.

**भारतामधील केळ्यांची लागवड**—भारतांत केळ्याखालीं किती जमीन आहे ह्यासंबंधीं १९४८–४९ सालीं खास चौकशी करण्यांत आली होती; तीवरून असें दिसून आलें कीं केळ्याखालील जमिनीचें एकूण क्षेत्र सुमारें ३,५०,२०८ एकर आहे.

**अमेरिकन विमानांची मदत**—अमेरिकन विमानदलाच्या एका तुकडीला भारतामधील टोळांचा नाश करण्याच्या कामीं सहाय करण्याची विनंति करण्यांत आली आहे असें समजतें. सी.–४७ जातीचीं वहातुकीचीं दोन विमानें जून महिन्यांत दिल्लीला येणार आहेत. प्रत्येक विमानांत २०० गॅलन डी. डी. टी. सांठवूं शकणाऱ्या टाक्या आहेत. ज्या भागांत टोळ अगर टोळांचीं अंडीं असतील त्या भागांवर ५०० फूट उंचीवरून डी. डी. टी. व रॉकेल ह्यांच्या मिश्रणाचा सडा घालण्यांत येईल.

**कान्स गवतापासून कागद**—संयुक्त प्रांत सरकारच्या ग्रामोद्योग खात्यानें ‘कान्स’ ह्या गवताचा उपयोग करून कागद तयार करण्यासाठीं लागणारा लगदा करण्याच्या कामीं यश मिळविलें आहे. प्रांतांतील बुंदेलखंड भागांत हें गवत मुबलक आढळून येत असल्यानें कागदाच्या धंद्याला पुरेसा पुरवठा होऊं शकेल. हें गवत शेतांत राहूं दिल्यास त्याचा पिकावर फार वाईट परिणाम होतो.

**मतदारांसाठीं ४०,००० तंबू**—येत्या डिसेंबरांत होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकींत मतदान करण्यासाठीं ४०,००० तंबू उभारण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे. प्रत्येक ७५० मतदारांमागें एक तंबू उभारण्यांत येणार आहे. स्त्रियांसाठीं वेगळे तंबू बांधण्यांत येणार असून त्यावर स्त्रियाच अधिकारी राहतील.

**इजिप्तला कापडाची निर्यात**—चालू वर्षी कापडाच्या गिरण्यांमधून जितकें उत्पादन होईल, त्यापैकीं ८·५ कोटी वार कापड इजिप्तला निर्यात करण्यासाठीं राखून ठेवण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. ह्या वर्षी करण्यांत येणाऱ्या एकूण निर्यात–कापडाच्या १० टक्के वरील कापड आहे.

**इजिप्तला कागदाचा पुरवठा**—इजिप्तमध्यें वृत्तपत्राच्या कागदाची टंचाई फारच भासूं लागली असल्यानें वृत्तपत्रांनीं आपले आकार कमी केले आहेत. रशिआनें इजिप्तला वृत्तपत्राचा कागद आणि कापड पुरविण्याचें कबूल केलें आहे. ह्या मालाच्या किंमती बाजारभावापेक्षां बऱ्याच कमी आहेत असें समजतें.

**हैदराबाद संस्थानांत आयुर्वेदाला मदत**—हैदराबाद संस्थानमधील कांहीं वैद्यकीय संस्थांना व हकीमांना देण्यांत येणारी मदत आतां बंद करण्यांत आली आहे. मदतीच्या रकमा बंद करण्यांत आल्यामुळें सरकारचे १,१०,००० रुपये वांचणार आहेत. वांचलेल्या रकमेंतून ५०,८०० रुपयांची रक्कम आयुर्वेदीय दवाखाने काढण्यासाठीं खर्च करण्यांत येणार आहे.

## महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांची सोय

### बृहन्महाराष्ट्र मंडळाचें दिल्लींतील माहिती केंद्र

( ग. वि. केतकर, प्रधानमंत्री, बृहन्महाराष्ट्र मंडळ, ९ मानसिंग रोड, नवी दिल्ली )

बृहन्महाराष्ट्र मंडळाची मध्यवर्ती कचेरी कायमची दिल्लीस असावी असें ठरविण्यांतील प्रमुख हेतु म्हणजे दिल्लीचें वाढतें महत्त्व लक्षांत घेऊन तेथें चालणाऱ्या विविध हालचालींची माहिती महाराष्ट्रास निश्चित स्वरूपांत मिळावी हा होता. ना. काकासाहेब गाडगीळ हे गेलीं तीन वर्षे मंडळाचे अध्यक्ष असून त्यांच्या कारकीर्दीत माहितीकेंद्राचें कार्य शक्य तों सर्वांगपरिपूर्ण करण्याचा प्रयत्न त्यांनीं चालविला आहे.

भारत सरकारच्या निरनिराळ्या खात्यांतून रोज नवेनवे हुकूम निघत असतात. महाराष्ट्रांतील व्यापाऱ्यांची प्रत्येक खात्यांत कांहींना कांहीं कामें दिरंगाईवर पडलेलीं असतात, होतकरू विद्यार्थ्यांना उत्कर्षदायी प्रवेश मिळण्याचे दृष्टीनें राजधानीच्या ठिकाणीं अनेक घडामोडी घडत असतात, भारत सरकारला लागणारें अन्यान्य विषयांचे तज्ज्ञ पुरविणें, तसेंच दिल्लीस होणाऱ्या परिक्षांची माहिती महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांस देणें, प्रवास करणारांना दिल्लीस अगर इतरत्र रहाण्याची व भोजनाची सोय, वगैरे दिल्लींतून चालणाऱ्या सर्व विविध स्वरूपाची माहिती मंडळानें एकत्रित केली आहे. मराठी वृत्तपत्रांना अशी माहिती पुरवून त्यांच्या मार्फत मंडळ आपलें कार्य नेटानें चालवीत असतें.

हें माहितीकेंद्र दिवसेंदिवस अधिक लोकप्रिय होत चालल्यानें त्याची उपयुक्तता वाढावी असें जर महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांना वाटत असेल तर अन्यप्रांतीय लोक ज्या नेटानें अशीं कामें करतात तसाच आपलाहि संच निर्माण होणें आवश्यक आहे. अध्यक्ष ना. काकासाहेब गाडगीळ व कार्याध्यक्ष श्री. पु. शं. पतके हे आपलीं नित्यनैमित्तिक कार्ये संभाळून माहितीकेंद्राचें कार्य यशस्वी करण्यासाठीं शक्य ती मदत करीत असतात. दिल्ली शहरांतील वाढतीं अंतरें, विषम हवामान व विनावेतन काम करणाऱ्यांच्या मर्यादा लक्षांत घेतां एकाद्या पगारी कार्यकर्ता आवश्यक आहे. त्याच्या कामासाठी लागणारी कचेरीची जागा, टेलिफोन, फर्निचर, इंग्रजी-मराठी टाईपरायटर, डुप्लीकेटिंग मशीन वगैरे साहित्य लवकर उपलब्ध होईल तितकें मंडळाचें हें कार्य अधिक उपयुक्त ठरणार आहे. जे महाराष्ट्रीय व्यापारी दिल्लीचा प्रवास करून प्रवासांत खर्च करतात, त्याच पैशाचा कांहीं भाग मंडळाच्या या कार्यास दिला तर महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्राचा हा जिवंत दुवा अधिक कार्यक्षम होईल व त्यांचेंही काम विनायासें होईल.

वरील मजकूर लिहितांना महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांवर कोणत्याही तऱ्हेचें आर्थिक दडपण आणण्याचा माझा मानस नाहीं. आम्हांस कोणीही आर्थिक मदत न करतां गेलीं तीन वर्षे आम्हीं हें काम नेटानें चालविलें आहे व तसेंच पुढेंही चालवूं. फक्त वरीच मंडळी आम्हांस ज्या निरनिराळ्या योजना सुचवीत आहेत त्यांना आमच्या अडचणी समजाव्यात या हेतूनें वरील मजकूर लिहिला आहे. दुसऱ्या परिच्छेदांत नमूद केलेल्या गोष्टींसंबंधीं आपण कोणतीही माहिती मजकडे खालील पत्त्यावर पांच रुपये पाठवून मिळवूं शकतां. हे पांच रुपये मंडळास देणगी म्हणून घेतले जातात, प्रत्यक्ष कामासाठी अवांतर खर्च लागल्यास तो वेगळा द्यावा लागतो.

---

**सीलोनच्या बँकांमधील नौकर**—कोलंबो एक्सचेंज बँक्स असोसिएशनच्या प्रतिनिधींनीं सीलोनचे मंत्री श्री. गुणेसिंह ह्यांची भेट घेतली. आपआपल्या बँकांतील कारकुनांच्या व पट्टेवाल्यांच्या जागा सीलोनी नागरिकांनाच देण्याचें त्यांनीं मान्य केलें आहे. हा निर्णय १ मे पासून अंमलांत आणण्यांत आला आहे. प्रतिनिधी मंडळांत भारतीय बँकांचा एकहि प्रतिनिधी नव्हता.

**पोलादी भांडीं करण्यास बंदी ?**—ब्रिटनमध्यें संरक्षणाच्या योजनांवर अधिक खर्च होऊं लागल्यामुळें निष्कलंक पोलादाचीं घरकामासाठी लागणारीं भांडीं तयार करण्यास लवकरच बंदी करण्यांत येणार आहे असें समजतें. ही बंदी निर्यात करण्यांत येणाऱ्या भांड्यांना लागू होईल कीं नाहीं तें अजून निश्चित नाहीं.


**हिंद फायनॅन्स, इंडस्ट्रीज अँड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड.**

इंडियन कंपनीच्या कायद्याखालीं नोंदलेली [ नोंदलेलें संक्षिप्त नांव : हिंदफिन

धनवटे चेंबर्स, सीताबर्डी, नागपूर १.

विक्रीस काढलेलें भांडवल रु. ५,००,०००

रु. ५० च्या दर्शनी किंमतीच्या १०,००० हिश्श्यांत विभागलेलें.

मुख्य उद्देशः—उद्योगधंदे व इतर कार्यासाठीं योग्य व्याजाच्या दरानें आर्थिक मदत देणें. तसेंच सोनें, चांदी व इतर मौल्यवान धातू व जवाहीर ह्यांचे दागदागिने तयार करणें, विकणें, व गहाण ठेवून घेणें. घरें बांधण्यासाठीं अथवा खरेदी करण्यासाठीं लांब मुदतीची कर्जे देणें, सेफ डिपॉझिट व्हॉल्ट बांधून अथवा भाड्यानें घेऊन, लोकांच्या मौल्यवान वस्तू ठेवून घेणें. लहान प्रमाणावर चालवतां येण्यासारखे धंदे स्थापन करणें, वगैरे वगैरे.

अध्यक्षः—श्रीमंत पूर्णचंद्रराव गोपाळराव बुटी.

श्री. गो. आ. भोंसुले, बी. कॉम्., सेवानिवृत्त मॅनेजर, सी. पी. अँड बेरार म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.
श्री. गो. रा. ओती, एम्. ए. } भोंसुले ओती कं. मॅनेजिंग एजन्सीचे भागीदार

हिस्सेदारांच्या ठेवी अत्यंत आकर्षक दरानें घेतल्या जातील.
गरजू हिस्सेदारांना तारण घेऊन सोईवार अटींवर कर्ज दिलें जाईल.
कंपनीचे हिस्से लवकर खरेदी करून कंपनीकडून मिळणारे अनेक फायदे मिळवा. अर्जाचे फॉर्म व त्रोटक माहितीपत्रक मागवून घ्या. हिस्से विक्रीसाठीं सन्मान्य, अनुभवी व वजनदार एजंट पाहिजेत.

# अर्थ

बुधवार, ता. ६ जून, १९५१



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## साखरेचे कारखाने कोठें व कसे हलवावे ?

भारतांतील साखर कारखान्यांत तयार होणाऱ्या साखरेच्या उत्पादनाची सरासरी किंमत फार असते हें प्रसिद्धच आहे. ही किंमत भारी असण्याचें कारण म्हणजे बहुतेक साखरेचे कारखाने आर्थिक दृष्ट्या न परवडणाऱ्या अशा ठिकाणीं वसलेले आहेत, हें होय. संयुक्त प्रांताच्या पूर्वेकडील भागांत साखर–कारखान्यांचें केंद्रीकरण झालेलें आढळून येतें. ह्या परिस्थितीवर उपाय एकच आहे; आणि तो म्हणजे आर्थिक दृष्ट्या अधिक सोयीस्कर अशा भागांत कारखाने हलविणें. वरील उपाय सर्व अधिकृत अहवालांतून मान्य करण्यांत आलेला आहे. परंतु कारखाने हलविण्याचा खर्च अतिशय आहे, त्यामुळें हा उपाय सहज अवलंबिण्यासारखा नाहीं. श्री. जयपुरिआ ह्यांनीं ह्याविषयीं एक योजना आंखली आहे. त्यांच्या मतानें, त्यांच्या योजनेंत कारखाने हलविण्याच्या खर्चाची योग्य अशी वांटणी करण्यांत आलेली असल्यानें कोणावरच गैरवाजवी बोजा पडणार नाहीं. सध्यां परिस्थिति अशी आहे कीं पूर्व-संयुक्त प्रांतांतील साखरेच्या कारखान्यांना पुरेसा ऊंस मिळत नाहीं आणि पश्चिम संयुक्त प्रांतांतील साखरेच्या कारखान्यांना मिळतो तितका ऊंस हंगामांत गाळतां येत नाहीं. तेव्हां ज्या भागांत उसाचें उत्पादन भरपूर आहे पण कारखान्यांची उत्पादनक्षमता कमी आहे, त्या भागांत अधिक कारखाने काढणें किंवा अपुऱ्या ऊंस–पुरवठ्याच्या भागांतील कारखाने तेथें हलविणें हा उपाय अगदीं सहज सुचण्यासारखा आहे. श्री. जयपुरिआ ह्यांनीं असा हिशेब केला आहे, कीं १९४६ ते १९४९ ह्या चार वर्षांत उसाचा अपुरा पुरवठा असणाऱ्या भागांतील साखर–कारखान्यांना दर हंगामाला सरासरी ५१७ लाख मण ऊंस कमी पडला. हे कारखाने जितका ऊंस गाळूं शकतात त्याच्या निम्म्याहून थोडासा अधिकच वरील टंचाईचा आंकडा आहे. म्हणजे ह्या कारखान्यांची उत्पादनक्षमता दर हंगामांत निम्मीच वापरली जात होती असा अर्थ होतो. ह्याच प्रमाणांत नाहीं, तरी प. संयुक्त प्रांतांतील साखर–कारखान्यांना उसाच्या भरमसाट पिकाला तोंड द्यावें लागतें. साखरेची किंमत ठरवितांना प्रांतांतील सर्व कारखाने जमेस धरून त्यांच्या सरासरी उत्पन्नाच्या किंमतीवर त्या ठरविण्यांत येतात. अर्थातच ज्या भागांतील साखर–कारखान्यांना उसाचा अपुरा पुरवठा येतो त्यांचें ह्या पद्धतीमुळें फार नुकसान होतें.

श्री. जयपुरिआ ह्यांच्या मतानें एक साखरेचा कारखाना हलविण्यास १५ लाख रुपये लागतील. ह्या रकमेचा तपशील त्यांनीं पुढीलप्रमाणें दिला आहे. एखादा कारखाना हलविल्यामुळें त्याच्या अगदीं नजीक असलेल्या ज्या कारखान्याला उसाचा पुरेसा पुरवठा होऊं शकेल त्या कारखान्यानें हलविण्याच्या खर्चापैकीं एक चतुर्थांश खर्च द्यावा. राज्यसरकार अगर मध्यवर्ती सरकार ह्यांनीं अगर दोघांनीं मिळून निम्मा खर्च द्यावा, आणि उरलेला एकचतुर्थांश खर्च हलविल्या जाणाऱ्या कारखान्यानें सोसावा. पूर्व संयुक्त–प्रांतांतच जे कारखाने ठेवण्यांत येतील त्यांनीं आपल्या हंगामाची मुदत दुप्पट करावी. असें केल्यानें त्यांची उत्पादनाची सरासरी किंमत उतरूं शकेल. ज्या साखर-कारखान्यांकडून सध्यां प्राप्तीवरील कर मिळत नाहीं, त्यांच्याकडून सरकारनें तो घेण्यास सुरवात करावी. जे कारखाने हलविले जातील त्यांना आपलीं उत्पन्नें वाढविण्याची संधि मिळेल हें उघडच आहे. संयुक्त-प्रांतांतून १५ कारखाने बाहेर हलवितां येण्यासारखे आहेत. त्यांपैकीं ८ कारखाने मुंबई राज्यांत हलविण्यांत यावेत. मुंबई सरकारनें आठ नव्या साखरेच्या कारखान्यांना परवानगी दिलेलीच आहे. साखरेचा नवा कारखाना काढावयाचा झाल्यास सुमारें ७५ लाख रुपये भांडवल लागेल, त्यापेक्षां चालू कारखान्यांपैकीं कांहीं कारखाने त्यांच्या एक पंचमांश खर्चांत म्हणजे १५ लाख रुपयांत योग्य ठिकाणीं हलविणेंच अधिक श्रेयस्कर आहे, असें श्री. जयपुरिआ ह्यांचें म्हणणें आहे.

---

**जागतिक बँक कर्ज उभारणार**—लंडनच्या नाणेबाजारांत पौंडी कर्ज उभारण्याचें जागतिक बँकेनें ठरविल्याची बातमी आहे. न्यूयॉर्क शहराच्या बाहेर कर्ज उभारण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. कर्जाची रक्कम बहुधा ५०,००,००० पौंड असेल; व ब्रिटिश कर्जरोख्यांवरील व्याजापेक्षां व्याजाचा दर थोडा अधिक असेल.

**टायरचा कारखाना बंद**—कार्बन ब्लॅक व अणि इतर कच्चा माल ह्यांचा तुटवडा पडल्यामुळें कलकत्त्याजवळील टायरचा व ट्यूबचा कारखाना एक महिनाभर बंद ठेवण्यांत आला आहे. भारतांतून कम्युनिस्ट चीनला टायरची निर्यात होत असल्यामुळें कारखान्याला लागणारा कच्चा माल कमी प्रमाणांत पाठविण्यासंबंधीं अमेरिकेंत विचार चालू झाला होता; त्याचा परिणाम असा झाला.

**रिझर्व्ह बँकेसाठी इमारत**—मद्रासमध्यें रिझर्व्ह बँक आपल्या मालकीची इमारत बांधण्याचा विचार करीत आहे. परंतु त्यापूर्वीं फोर्ट स्टेशनजवळ रेल्वेलाईनवरून जाणारा एक पूल होणें आवश्यक आहे. रेल्वेचे अधिकारी, मद्रास कॉर्पोरेशन आणि रिझर्व्ह बँक ह्यांच्या दरम्यान सध्यां वाटाघाटी चालू आहेत. पुलाला एकूण खर्च २७ लाख रुपये येईल.

**बँकांच्या तंट्यावाबत बोर्ड**—बँका व त्यांचे नोकरवर्ग ह्यांच्यांतील तंट्यांचा निवाडा करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें जी तडजोडसमिति नेमली आहे, तिचें अध्यक्षपद श्री. सेन ह्यांना देण्यांत आलें आहे. श्री. सेन हे कलकत्त्याचे सेवानिवृत्त हायकोर्ट जज्ज आहेत. बोर्डावर बँकांचे दोन प्रतिनिधी आणि नोकरवर्गाचे दोन प्रतिनिधी घेण्यांत आले आहेत. बँका व त्यांचे ६०,००० नोकर' ह्यांच्यांत उद्भवलेले १० मुद्दे बोर्डापुढें निर्णयासाठी ठेवण्यांत येतील. त्याशिवाय पंजाब बँकेंतील ज्या १५० नोकरांना संपानंतर पुन्हां कामावर घेण्यांत आलें नाहीं, त्यांचींहि प्रकरणें विचारासाठी मांडण्यांत येणार आहेत.

## ग्रेट ब्रिटनमधील चित्रपटांच्या धंद्याची दुःस्थिति

तीन वर्षांपूर्वी ग्रेटब्रिटनमधील चित्रपटांचें उत्पादन घटलें होतें, त्यांतील तंत्रज्ञांत बेकारी माजली होती आणि निर्मात्यांचा उत्पादनखर्च भागण्याइतकेंहि उत्पन्न त्यांना मिळत नसे. १९४८ मध्यें, चित्रपटाच्या धंद्यास सरकारी मदत करण्याची योजना बोर्ड ऑफ ट्रेडच्या अध्यक्षांनीं जाहीर केली आणि १९४९ च्या प्रारंभीं नॅशनल फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशनची पार्लमेंटच्या खास कायद्यानें स्थापना केली. ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनचे पहिले प्रमुख, लॉर्ड रीथ ह्यांची चेअरमनचे जागीं निवड करण्यांत आली. ब्रिटिश तिजोरींतून कॉर्पोरेशनला ५० लक्ष पौंड मिळाले आणि तिनें किफायतशीर चित्रपटांच्या निर्मितीस सहाय्य करण्यास तात्काळ प्रारंभ केला. "पैसे थोडे धोक्यांत आले, तरी चित्रपटनिर्मितीस बाध येतां कामा नये" ह्या धोरणानें कॉर्पोरेशननें व्यवहार केला. आपल्या चित्रपटाच्या प्रकाशनचा करार पुरा करूनच बहुधा निर्माता कॉर्पोरेशनकडे कर्जासाठीं जातो. अशा कराराचे आधारावर बँक उत्पादन-खर्चाच्या ७५% पर्यंत कर्ज बहुधा देते. उत्पादकाची योजना कॉर्पोरेशनला पसंत पडली, तर बाकीची रकम (उत्पादकानें स्वतः घातलेली रकम वगळून) कॉर्पोरेशन देते. उत्पादकाची गुंतवणूक ही प्रथम खर्च होते व सर्वांत शेवटीं त्याला परत मिळते. म्हणजे, नुकसान आलें, तर उत्पादकाचा पैसा प्रथम बुडतो. अंदाजपत्रकाच्या बाहेर चित्रपटाच्या निर्मितीचा खर्च गेला, तर ह्या जादा खर्चास लागणारी रकम पुरविण्याची हमी घेणारे लोक अथवा संस्था (गॅरंटॉर) कॉर्पोरेशनच्या कर्जास आवश्यक असतात. जनतेचा पैसा ज्यांत गुंतविण्याचा, त्या चित्रपटांच्या तपशिलांत कॉर्पोरेशननें जाणें अपरिहार्यच ठरतें. चांगली गोष्ट, नट-नटी, दिग्दर्शन, इत्यादि बाबतींत मतैक्य होणें अशक्य असलें तरी एकंदरीनें पहातां, कॉर्पोरेशननें ह्या संबंधांतील आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केलेला नाहीं, असें आढळून येतें. चित्रपट-धंद्याच्या उत्पन्नखर्चांतील तूट कॉर्पोरेशनला भरून काढतां येणार नाहीं हें उघड आहे. हा धंदा स्वतःच्या पायावरच अखेर उभा राहिला पाहिजे. परंतु उत्पादन वाढवन बेकारी कमी करणें आणि डॉलर्स मिळविण्याचा संभव निर्माण करणें एवढाच कॉर्पोरेशनचा तात्कालिक उद्देश आहे.

नॅशनल फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या ताज्या अहवालावरून असें दिसतें, कीं ब्रिटिश चित्रपटधंद्यास कर्जाऊ देण्यासाठीं तिला पार्लमेंटनें ६० लक्ष पौंड मंजूर केले त्यांपैकीं आतां तिचेजवळ फक्त १० लक्ष पौंड शिल्लक आहेत; आणि हेहि लवकरच संपून जातील. परतफेडीस प्रारंभ झाला असला तरी तिची गति फारच मंद आहे. बुडीत कर्ज वाढलें आहे. १९४९ अखेर फिल्म-धंद्यांत ७,७४० तंत्रज्ञ कामावर होते; त्यांची संख्या फेब्रुवारी, १९५१ अखेर फक्त ३,४४० उरली आहे. ह्यावरून ग्रेटब्रिटन-मधील फिल्मधंद्याच्या उतरत्या कळेची कल्पना येईल. ब्रिटिश चित्रपटाचा दर्जा चांगला नसल्यानें त्यांना मागणीच पुरेशी येत नाहीं. कच्च्या फिल्मच्या तुटवड्यामुळें अडचणींत भरच पडली आहे. केवळ भांडवल पुरवठ्याची कांहीं अंशीं सोय झाली, तरी इतर अडचणी दूर होणें कठीण असतें, ह्याचें नॅशनल फिल्म फि. कॉर्पोरेशनचा अनुभव हें उत्कृष्ट उदाहरण आहे.


## श्री. ना. दा. ठाकरसी कॉलेज पुणें ४.

महिला विद्यापीठाच्या या कॉलेजची पहिली सहामाही दि. १५ जून १९५१ ला सुरू होईल. त्याच दिवशीं वसतिगृह उघडेल.

बी. ए. पर्यंतचा शिक्षणक्रम तीन वर्षांचा असून आवश्यक व ऐच्छिक विषय मातृभाषेंतून शिकविले जातात. गांवांतून येणाऱ्या विद्यार्थिनींसाठीं म्यूनिसिपल कॉर्पोरेशनकडून बसची व्यवस्थाहि करण्यांत आली आहे.

त्याचप्रमाणें १ जुलै १९५१ पासून कॉलेजमध्यें सुरू होणाऱ्या बी. टी. क्लासमध्यें ज्यांना प्रवेश पाहिजे असेल त्यांनींहि त्वरित दहा रुपये प्रवेश-फी पाठवून नांवें नोंदवावींत.

कॉलेजची वेळ दुपारीं १२ ते ४. सविस्तर माहितीसाठीं माहिती-पत्रक मागवावें अगर समक्ष भेटावें. ऑफिसची वेळ सकाळीं ८॥ ते ११.

सौ. शरयू बाळ,
प्रिन्सिपल.

## सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास

नाशिक जिल्ह्यांतील सर्व तालुका डेव्हलपमेंट असोसिएशनचे नोकर व सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरीचा ट्रेनिंगक्लास सटाणा येथील तालुका डेव्हलपमेंट असोसिएशनचे इमारतींत ता. १५-६-५१ ते १५-७-५१ अखेर मुदतीचा घ्यावयाचा आहे. ज्या उमेदवारांस सहकारी शिक्षण घ्यावयाचें असेल त्यांनीं खालील सही करणार यांजकडे ता. १३-६-५१ चे आंत अर्ज करावेत. अर्जासोबत क्लास फी रु. ३ लगत पाठवावी. उमेदवाराचें शिक्षण निदान व्ह. फा. पास झालेला अगर परीक्षेस बसलेला पाहिजे अगर सहकारी संस्थेंत काम करीत असला पाहिजे. उमेदवारास सदर शिक्षण स्वःखर्चानें घ्यावें लागेल. क्लास फी भरल्यानंतर कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाहीं. क्लासानंतर परिक्षेंत यशस्वी उमेदवारांना सेक्रेटरी म्हणून नेमण्याची व्यवस्था करण्यांत येईल. उमेदवारांनीं सटाणे येथें ता. डेव्ह. असोसिएशनच्या ऑफिसांत समक्ष ता. १५-६-५१ रोजीं सकाळीं ११ वाजतां बिनचूक हजर व्हावें.

एन्. वाय्. कुळकर्णी
को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर,
(घर नं. २१७८, मधली होळी) नाशिक.

## DECCAN INSTITUTE OF COMMERCE

594, Budhwar, Poona 2,

Classes for 1951-52 Session will begin on, Wednesday the 20th June 1951. G. D. C., L. C. C. D Com., C A. (1st), G. D. C. & A., C. A. I. I. B., Shorthand, Typewriting Courses. Morning and Evening classes. Prospectus free on application to the Secretary.

## B. M. College of Commerce, Poona 4

The College will open for the academic year on 11th June 1951. Applications for admission should be made immediately after the result of the qualifying examination with Rs. 10 as deposit plus Rs. 10 if hostel accommodation is required and Rs. 10/- eligibility certificate. Prospectus and application form on receipt of annas five.

Fee for the first term Rs. 122/- to be paid at the time of admission.

Principal.

## मलाया व भारत ह्यांचा व्यापार

सिंगापूर इंडिअन चेंबर ऑफ कॉमर्सचे मावळते अध्यक्ष मि. आर. जुम्माभॉय ह्यांनीं भारतांतून मलायांत निर्यात करतां येण्यासारख्या मालाला बराच वाव आहे असा अभिप्राय नुकताच व्यक्त केला आहे. सामान्यपणें अशी समजूत पसरलेली आढळते कीं भारतीय कापडालाच काय ती मलायांत बाजारपेठ मिळूं शकेल. पण ही समजूत बरोबर नाहीं. मि. जुम्माभॉय ह्यांच्या मतानें इमारतीला लागणारें सामान, विशेषतः सिमेंट आणि कौलें, खिळे, मोळे, एनॅमलच्या वस्तु, छोटीं यंत्रें, हत्यारें व शेतकीचीं अवजारें, विजेचे पंखे व इतर सामान, तंबाखू, सिगारेट्स, सौंदर्य-प्रसाधनें इत्यादि अनेक प्रकारचा माल मलायांत निर्यात करतां येण्यासारखा आहे. मलायांतील बाजारपेठेंत हिंदी कापडालाहि चांगली मागणी आहे. गेल्या वर्षी भारताकडून मलायानें १९,५६,६७,५१९ मलायी डॉलर्सचा माल विकत घेतला. उलटपक्षीं भारतानें ७,५९,५६,९१२ मलायी डॉलर्सचा माल आयात केला. भारत व मलाया ह्यांच्या व्यापारांत भारताला अनुकूल अशी तफावत दिसत असली, तरी भारतीय सरकारच्या निर्यात विषयक अस्थिर धोरणामुळें मलायांतील हिंदी व्यापाऱ्यांना लक्षावधि डॉलर्सचें नुकसान झालें आहे अशी टीकाहि त्यांनीं केली आहे. भारतीय व्यापाऱ्यांना विश्वासांत घेऊन त्यांची सल्लामसलत न घेतल्यानें बँकांचें कमिशन व रुपयांची हुंडणावळ देण्याघेण्याचा व्यवहार करण्याचें रद्द झालेले करार ह्यांच्या पायीं व्यापाऱ्यांना फार नुकसान सोसावें लागलें, असें त्यांचें म्हणणें आहे. भारतीय सरकारशीं ह्या बाबतींत चेंबरच्या वाटाघाटी चालू आहेत, असें समजतें.

---

### जाहिरातदारांच्या दृष्टिकोनांतून अमेरिकन मासिकांचें महत्त्व

| | मासिकाचें नांव | जाने.–डिसें. १९५० मधील जाहिरातींवरील खर्च डॉलर्स |
|---|---|---|
| १ | लाईफ | ८,०३,६५,५०७ |
| २ | सॅटर्डे ईव्हिनिंग पोस्ट | ६,३१,८०,६११ |
| ३ | टाइम | २,३७,९३,८७० |
| ४ | लेडीज होम जर्नल | २,२४,८५,१६३ |
| ५ | बेटर होम्स अँड गार्डन्स | १,९९,३१,२२८ |
| ६ | लुक | १,७७,६५,११० |
| ७ | कोलिअर्स | १,७३,९७,०६६ |
| ८ | गुड हाउसकीपिंग | १,५३,७३,२४२ |
| ९ | वुमन्स होम कंपॅनिअन | १,१७,७५,२३० |
| १० | न्यूजवीक | १,०१,८४,७१७ |
| ११ | मॅक्कॉल्स | ९९,४०,८५८ |
| १२ | बिझिनेस वीक | ७४,५३,२६६ |
| १३ | वूमन्स डे | ७१,३८,३०२ |
| १४ | न्यू यॉर्कर | ६९,१९,६७२ |
| १५ | अमेरिकन होम | ६६,०७,८९७ |
| १६ | व्होग | ५७,६६,५८२ |
| १७ | फॅमिली सर्कल | ४४,६२,८७५ |
| १८ | पेरेंट्स मॅगेझिन | ४३,३७,३३९ |
| १९ | एस्कायर | ४२,६२,६९२ |
| २० | हाउस ब्यूटिफुल | ४२,३९,७७७ |

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
ठेवी १ कोटीवर
हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.
शाखा : दादर, माहीम, बेळगांव, पुणें.

## दी लिटल शॉप ( लहान दुकानदारी )*

तीन लाख वस्तीच्या हल ह्या औद्योगिक शहरांतील स्वतंत्र नि प्रातिनिधिक अशा १०० लहान दुकानांच्या सामाजिक पहाणीचा वृत्तांत, तेथील युनिव्हर्सिटींतील समाजशास्त्राचे प्रोफेसर डॉ. एफ. डी. क्लिंगेंडर यांनीं ह्या पुस्तिकेंत दिला आहे. अशा तऱ्हेचे पहाणीचे अहवाल नेहमीं तक्ते, कोष्टकें वगैरेनीं भरगच्च असतात. पण ही पुस्तिका त्यास अपवाद आहे. नमुन्यादाखल म्हणून २० दुकानदारांची माहिती गोष्टीरूपानें तींत दिली असून ती अत्यंत वाचनीय व उद्बोधक झाली आहे. इंग्लंडमधील लहान दुकानदारांचें सध्यांचें स्थान कोणतें ह्यावर प्रस्तुत प्रकाशनानें चांगला प्रकाश पाडला आहे. स्वतःचें पुरेसें भांडवल नसलेल्या लहान दुकानदारांची आर्थिक परिस्थिति, कसबी कामगार अगर कचेऱ्यांत काम करणारा नोकरवर्ग ह्यांच्यापेक्षां बरी नसल्याचें पहाणींत आढळलें. असें असूनहि, उपभोगण्यास मिळणारें स्वातंत्र्य नि उत्कर्ष होण्याची शक्यता ह्या दोन आकर्षणामुळें ते धंद्याला चिकटून राहिले होते. घाऊक नि किरकोळीचा व्यवहार करणाऱ्या मोठ्या दुकानदारांकडून तीव्र चढाओढ होत असल्याकारणानें लहान दुकानदारांचें मुख्य बाजारपेठेंतून उच्चाटन झालेलें दिसलें, तसेंच खात्रीच्या ( branded ) मालाच्या किंमती उत्पादकांकडून ठरविण्यांत येत असल्यामुळें त्यांच्या नफ्याचें व उत्पन्नाचें प्रमाण अनिश्चित झालें आहे. अशी सर्व परिस्थिति असतांनाहि, लहान दुकानें ह्यापुढेंहि कायम राहतील असा निष्कर्ष लेखकानें काढला आहे. घरांतील सर्व मंडळींसुद्धां लहान दुकानदार अमर्याद काळ राबतो किंवा राबूं शकतो हें त्याचें प्रमुख कारण दिसलें. दुसरें कारण तो गिऱ्हाइकांना उधार माल देतो हें होय. उधारीमुळें गिऱ्हाइकांची, विशेषतः मजूर वस्तींतील, तात्पुरती अडचण भागत असल्यामुळें त्यांचे संबंध लहान दुकानदारांशीं निगडित झालेले आहेत. पुरुषांचा वेळ कामधंद्याचे निमित्तानें आपल्या सहकाऱ्यांबरोबर जातो. पण घर संभाळणाऱ्या बायकांना सामाजिक जीवन जगण्यास मिळत नाहीं. जिनसा खरेदी करण्याकरितां गेल्यावर त्यांना दुकानदारांशीं गप्पागोष्टी करण्याची संधि मिळते व करमणूक होते. थोडक्यांत, कामगारवर्गांतील घर संभाळणाऱ्या बायकांना लहान दुकानें करमणूक व विचारविनिमय केंद्रें म्हणून उपयोगी पडतात; व इंग्लंडमधील लहान दुकानदारीचें हें सर्वांत महत्त्वाचें अंग आहे असें लेखकाचें म्हणणें आहे. लेखकानें केलेली कारणमीमांसा व मांडलेले सिद्धांत हिंदुस्थानांतील लहान दुकानदारांच्या बाबतींत बऱ्याच प्रमाणांत लागूं पडतील असें म्हटल्यास तें चुकीचें ठरणार नाहीं. स्थानिक उद्योगधंद्यांची सामाजिक पहाणी अत्यंत सुबोध रीतीनें कशी करतां येईल, हें प्रस्तुत पुस्तिकेनें दाखवून दिलें आहे.

—रा. गो. काकडे

*दी ब्यूरो ऑफ करंट अ‍ॅफेअर्स, ११७ पिकॅडिली, लंडन W. 1 प्रकाशन नं. १२७, पृष्ठसंख्या-१८, किंमत ९ पेन्स.

## डॉ. मथाई यांचे आजच्या आर्थिक परिस्थितीबद्दल विचार

पुणें येथें बृहन्‌-महाराष्ट्र व्यापारी कॉलेजच्या इमारतीच्या कोनशिला प्रसंगीं नुकतेंच माजी अर्थमंत्री डॉ. जॉन मथाई यांनीं आजच्या आर्थिक परिस्थितीबद्दल पुढील आशयाचे विचार व्यक्त केले:—

"रुपयाच्या अवमूल्यनानंतर जागतिक आर्थिक परिस्थितींत पुष्कळच फरक पडले आहेत. निर्गत बाजारपेठ ही १९४९ सालीं खरेदीदारांची बाजारपेठ बनूं लागली होती, परंतु ती आतां पुन्हां विक्रेत्यांची बाजारपेठ बनली आहे. पाकिस्तानी रुपयाच्या दराला आंतरराष्ट्रीय चलननिधीनें व हिंदनें मान्यता दिली आहे. व्यापारी हिशेबांतील देण्याच्या प्रश्नाला निराळें अनुकूल स्वरूप प्राप्त झालें आहे. अन्नधान्याची आयात जास्त प्रमाणांत आवश्यक बनली आहे. अशा परिस्थितींत हिंदी रुपयाच्या हुंडणावळीच्या दराचा फेरविचार करण्याची वेळ आली आहे. आंतरराष्ट्रीय चलननिधीचा हिंद सदस्य असून या निधीच्या कार्याबद्दल फार विश्वास वाटत होता. परंतु या निधीच्या कार्याच्या बाबतींत बरीच निराशा झाली आहे. व्यापारी दृष्टीनें स्टर्लिंग राष्ट्रांच्या गटाची एकजूट हळू हळू कमी होत जात आहे असें दिसतें. कारण, कांहीं राष्ट्रें स्टर्लिंग गटाचा मुख्य उद्देश बाजूला सारून स्वतःच्या सोईच्या दृष्टीनें व्यापार करूं लागलीं आहेत.

"चलनविस्तार कमी करण्यासाठीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष करवाढ करणें हें धोरण आजच्या परिस्थितींत प्रभावी ठरणार नाहीं. कारण, कर लादण्याच्या बाबतींत उच्च सीमा गांठण्यांत आलेली आहे. सरकारला आपल्या खर्चांत काटकसर करावयास अवसर आहे. करवाढीमुळें बचत करण्याची थोडीफार असलेली प्रवृत्ति नष्ट होईल व राहणीच्या मानावरहि आणखी अनिष्ट परिणाम होईल. आजच्या परिस्थितीवर वाढतें उत्पादन हा एकच उपाय आहे. उत्पादनाच्या नवीन योजनांवर आज विशेष भर दिला जात आहे, त्यापेक्षां अस्तित्वांत असलेल्या कारखान्यांची उत्पादनक्षमता वाढविण्याचे आणखी प्रयत्न केले पाहिजेत. शेतीच्या बाबतींतहि नवीन जमिनी लागवडीखालीं आणण्याऐवजीं जुन्या जमिनीची उत्पन्नाच्या दृष्टीनें सुधारणा करणें जास्त आवश्यक आहे.

"नियंत्रणामुळें चलनवाढीला कायमचा आळा बसत नाहीं तर कांहीं अनिष्ट गोष्टी दूर होतात एवढेंच. चलनवाढीच्या मुळाशीं असलेली परिस्थिति बदलली पाहिजे. आवश्यक वस्तूंच्या बाबतींत नियंत्रणें ठेवणें जरूर आहेच. परंतु नियंत्रित किंमती मालाचें उत्पादन करणारांना परवडतात कीं नाहीं हा मुख्य प्रश्न आहे व त्याकडे लक्ष दिलें पाहिजे. आजच्या नियंत्रणामुळें चलनविस्ताराला आळा बसत नसून चलनविस्तारामुळें निर्माण होणाऱ्या कांहीं अनिष्ट गोष्टींना तात्पुरता आळा बसला आहे एवढेंच. आपण अशा स्थितीकडे जात आहोंत कीं खरी सुधारणा होण्याच्या पूर्वी चलनविस्तारामुळें निर्माण होणाऱ्या आणखी वाईट परिस्थितीला आपल्याला तोंड द्यावें लागेल."

---

**भारताची कापडाची निर्यात**-१९५० सालीं डॉलरच्या कक्षेंतील देशांत कापडाची निर्यात करून भारतानें १९ कोटी, ८० लाख डॉलर्स मिळविले. चालू वर्षी किती कापड निर्यात करावयाचें तें ठरविण्यांत आलेलें नाहीं.

## पुणें सें. को. बँकेच्या खेड शाखेचा रौप्यमहोत्सव

पुणें सें. को. बँकेच्या खेड शाखेचा रौप्यमहोत्सव समारंभ ता. १० मे रोजीं खेड येथें श्री. वैकुंठराय मेहता, अर्थ-सहकार मंत्री, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या उत्साहानें पार पडला. त्यानिमित्त बँकेनें एक उत्कृष्ट रौप्यमहोत्सव ग्रंथ प्रकाशित केला आहे. त्यांत खेड शाखेच्या २५ वर्षांच्या कामगिरीचा त्रोटक अहवाल सादर करण्यांत आला आहे. खेड शाखा ही बँकेची पहिली शाखा असल्यानें, जिल्हा मध्यवर्ती बँकांनीं ठिकठिकाणीं शाखा-कचेऱ्या उघडून त्यांचे करवीं सहकारी संस्था व त्यांचे सभासद ह्यांची सेवा व मार्गदर्शन करणें कसें विशेष उपयोगी पडते व त्यामुळें शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनांत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीनें कितपत उपयोग होतो, ह्याची माहिती प्रस्तुत अहवालावरून येण्याजोगी आहे. शाखेच्या प्रगतीचे वृत्तांताबरोबर खेड तालुक्यांतील निरनिराळ्या सहकारी संस्थांची त्रोटक माहिती आणि सार्वजनिक कार्यकर्त्यांचा त्रोटक परिचय हेहि देण्यांत आले असल्यानें अहवालाची उपयुक्तता वाढली आहे. शाखेचा २५ वर्षांतील इतिहास घडवून आणण्यास बँकेच्या ज्या संचालकांचे व अम्मलदारांचे परिश्रम कारणीभूत झाले, त्यांचीहि संगतवार माहिती अहवालांत आढळते. आवश्यक ते तक्ते व छायाचित्रें ह्यामुळें महोत्सव ग्रंथ आकर्षक झाला आहे. त्याबद्दल बँकेचे चेअरमन श्री. ग. र. तुळशीबागवाले, बी. ए., एल.एल. बी. ह्यांनीं आपल्या निवेदनांत अहवालाच्या आटोपशीरपणाबद्दल व उद्बोधकपणाबद्दल त्यांच्या सहकाऱ्यांना व अधिकारी वर्गाला धन्यवाद दिले आहेत, हें योग्यच आहे.

### खेड-शाखेचें अध्यक्षकृत सिंहावलोकन

बँकेचे अध्यक्ष, श्री. तुळशीबागवाले, ह्यांनीं आपल्या स्वागतपर भाषणांत खेड-शाखेच्या सद्यांच्या व्यवहाराबाबत खालील प्रमाणें आकडेवार माहिती सांगितली:—

"खेड शाखेला जोडलेल्या सोसायट्यांची संख्या ४२ आहे. सोसायट्यांच्या सभासदांची संख्या २,१८५ आहे. खेड तालुक्यांत एकूण १५८ गांवांपैकीं ११२ गांवें सोसायट्यांच्या कार्यक्षेत्रांत येत आहेत. या सोसायट्यांचें भागाचें भांडवल रु. ४०,२६५ व रिझर्व्ह फंड रु. ४७,९४५ आहे. सर्व सोसायट्यांचें खेळतें भांडवल रु. २,०८,४२७ आहे. खेड तालुक्याची लोकसंख्या नवीन खानेसुमारीप्रमाणें १,२६,०५७ आहे. एकूण खातेदार या तालुक्यांत २८,१२१ असून, जमीन महसूल रु. २,२६,१२७-६-२ एवढा आहे. सर्व सोसायट्यांकडे बँकेचें कर्ज रु. १,०२,११९ असून थकबाकी रु. ८,५८६ आहे. सभासदांकडे सोसायटीची येणें बाकी १,१७,२१० असून सभासदांची सोसायटीकडे थकबाकी रु. ३५,३६६ आहे. सोसायट्यांच्या कार्यक्षेत्रांत येत नसलेल्या ४६ गांवांना सहकारी चळवळीचा लाभ होत राहील, अशाबद्दल बँकेकडून प्रयत्न चालू आहेत"

---

### श्री. भट ह्यांचें यश

सहकारी चर्चामंडळाचे चिटणीस व पुणें शहर म्यु. स. को. बँकेचे माजी चेअरमन श्री. रामकृष्ण दत्तात्रय भट हे गेल्या इंटर-आर्टस परीक्षेंत उत्तीर्ण झाले. म्युनिसिपालिटींतील आपली नोकरी संभाळून व सार्वजनिक कार्यांत योग्य तो भाग घेऊन त्यांनीं वयाच्या ४३ व्या वर्षी हें यश मिळविलें. त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

# ग्राहक सहकारी संस्थांची घटना व कार्यपद्धति

[ श्री. कृ. ता. मंत्री, बी. ए., बी. टी., एल. सी. पी. (लंडन), डिप. एड. ( एडि. )., जे. पी., ऑ. प्रे. मॅजिस्ट्रेट, बृहन्मुंबई ग्राहक सहकारी संस्था संघाचे अध्यक्ष, यांचें अखिल महिला परिषदेतर्फे चालविलेल्या बौद्धिक वर्गापुढें झालेलें व्याख्यान. ]

( २ )

### व्यापारपद्धति

७. चोख व कार्यक्षम कारभाराप्रमाणें दुकानांतील पुरवठ्याचें कामहि प्रामाणिकपणा, कळकळ व आपुलकी या भावनांनीं झालें पाहिजे. योग्य वेळीं जरूर तो माल दुकानांत उपलब्ध असला पाहिजे. विक्रेत्या नोकरांना योग्य पगार देणें हें अत्यंत जरूर आहे. तसेंच त्यांनीं सेवाभावानें ग्राहकांच्याकडे वागलें पाहिजे. गर्दीच्या वेळीं व्यवस्थापक मंडळाचे सभासदांपैकीं कोणीतरी विक्रेत्यांना मदत करण्यास तयार असणें बरें. गिऱ्हाइकांना दुकानाचें आकर्षण वाटलें पाहिजे. असें वातावरण सदा सर्वकाळ राखणें हें विक्रेत्यांचें व कार्यकर्त्यांचें काम आहे.

८. रोखीचा व्यवहार हें आणखी एक मूलभूत सहकारी तत्त्व आहे. पण मर्यादित उत्पन्नाच्या माणसांना हा व्यवहार केव्हां केव्हां कठीण जातो व यामुळें तीं माणसें उधारीनें व्यवहार करणाऱ्या खासगी व्यापाऱ्यांकडे ओढलीं जातात. ही स्थिति सहकारी संस्था टाळूं शकते.

वरील प्रकारच्या, किंवा सर्वच गिऱ्हाइकांकडून ठेवी घ्यावयाच्या व त्यांवर माल द्यावयाचा. त्या मालाची किंमत येईल त्यावेळीं त्यांच्या खात्याला जमा करावयाची. पुष्कळ लोकांना वार्षिक बोनस किंवा पगारवाढ या कारणांनीं नेहमींहून अधिक पैसा एकाद्या महिन्यास त्यांच्या हातीं येतो. त्यापैकीं कांहीं रक्कम सहकारी दुकानांत ठेव म्हणून ठेवण्याची प्रवृत्ति ग्राहकांत निर्माण करण्याच्या अनेक संधी सहकारी संस्थेच्या चालकांस मिळतात.

९. सहकारी दुकानाचें ग्राहकांस आकर्षण वाटूं लावण्याचा आणखी एक मार्ग आहे. तो म्हणजे माल प्रामाणिकपणें, पूर्ण माप, व चांगल्या प्रतीचा घरपोंच करणें हा होय. या पद्धतींत तोटा नाहीं. पण थोड्याशा जादा खर्चांत गिऱ्हाइकांचा वेळ वांचतो, सोय होते. मुंबईसारख्या शहरांत तर अशा सोईचें गिऱ्हाईक आनंदानें स्वागत करतील.

१०. दुकान आकर्षक करण्याचा तिसरा एक मार्ग आहे. तो म्हणजे दुकानावर होणाऱ्या निव्वळ नफ्याचा कांहीं भाग प्रत्येक ग्राहकाला त्याच्या खरेदीच्या प्रमाणांत वर्षअखेर वांटणें हा होय. याला ' प्रो-रेटा रिबेट ' असें म्हणतात. पुष्कळ गिऱ्हाइकें हा रिबेट परत न घेतां त्यांतून संस्थेचा एक किंवा अनेक भाग विकत घेतात. अशा रीतीनें गिऱ्हाईक व संस्था या दोघांचाही फायदा होतो.

११. हा नफा गिऱ्हाइकांस न वांटता सभासदांना कांहींतरी शैक्षणिक, मनोरंजनपर किंवा समाजोपयोगी सोई निर्माण करण्याच्या कामीं खर्च करण्यासहि संस्थांना मोकळीक आहे.

१२. सहकारी संस्थांचा हेतु पुरवलेल्या जीवनावश्यक वस्तूंवर नफा घेणें हा नाहीं हें वर सांगितलें. पण या बाबतींत एक इशारा देऊन ठेवणें इष्ट वाटतें. सहकारी दुकानाबद्दल शेजारच्या खाजगी व्यापाऱ्यांना साहाजिकच हेवा वाटत असतो. म्हणून आपल्यास एकादी वस्तु थोडक्या किंमतींत पडली आहे म्हणून ती फार स्वस्त विकूं नये. कारण तसें केल्यानें शेजारच्या खाजगी दुकानदाराचा हेवाच नव्हे, तर सूडबुद्धीहि आपण जागृत करण्याची भीति आहे. हें टाळणें हें महत्त्वाचें सहकारी तत्त्व आहे. पैसा, दोन पैसे रुपयामागें स्वस्त माल विकला तर चालेल, पण बाजारभावानेंच तो विकून त्यायोगें सांठलेला नफा वरीलप्रमाणें गिऱ्हाइकांच्या पदरांत घालणें अधिक बरें.

१३. वस्तु स्वस्त मिळते म्हणून नव्हे, तर हें माझें दुकान आहे, येथें माझे बंधुभगिनी स्वार्थत्यागपर्वक, सेवावृत्तीनें कार्य करीत आहेत, या दुकानाची भरभराट ही अंतीं माझ्याच फायद्याची आहे, या निष्ठेनें गिऱ्हाईक सहकारी दुकानांवर आकर्षित झालें पाहिजे.

१४. सहकारी संस्थेच्या व्यापाराची प्रगति होण्याच्या बाबतींत आणखी एक काळजी घेतली पाहिजे. ती म्हणजे तिचे हिशेब पद्धतशीर, चोख व संशयातीत राखणें ही होय. यासाठींच कार्यकर्ती माणसें शीलवान व कार्यक्षम असलीं पाहिजेत.

### संघटनेची जरुरी

१५. सहकारी संस्था कार्यक्षम व प्रभावी होण्यासाठीं त्यांचें एकाद्या मध्यवर्ती संस्थेच्या नियंत्रणाखालीं संघटन होणें हें सहकारी चळवळीच्या विकासाच्या दृष्टीनें जरूर आहे. सहकारी व्यापाराच्या योगानें खासगी व्यापाऱ्यांचा हेवा व केव्हां केव्हां सूडबुद्धीहि निर्माण होते असें वर सांगितलें आणि या दुष्ट प्रवृत्ति कधीं कधीं इतक्या प्रबळ होतात कीं सहकारी दुकानांना ठार मारण्यासाठीं खासगी व्यापारी तात्पुरता तोटा पत्करूनहि आपला माल विकण्यास तयार होतो. अशा वेळीं गिऱ्हाइकांची निष्ठा हा एक तरुणोपाय आहे हें वर सांगितलें; पण या संकटाला सर्वांची संघटित शक्ति हाच परिणामकारक उपाय आहे हें अनुभवानें सिद्ध झालेलें आहे.

आज गिऱ्हाईक जीवनावश्यक पदार्थांच्या बाबतींत जें हैराण होत आहे त्याचें मुख्य कारण म्हणजे पदार्थांची उत्पादन किंमत आणि गिऱ्हाइकाला त्याला द्यावी लागणारी अंतिम किंमत यांमधील भरमसाट अंतर हें होय. ही गोष्ट उघड असूनही कोणाही एकाकी संस्थेला ती निवारतां येणार नाहीं एवढा तो प्रश्न मोठा आहे. तथापि ५०-७५ संस्था संघटित होऊन त्यांनीं एक मध्यवर्ती संघ-फेडरेशन स्थापन केलें तर त्याला कांहीं पदार्थ थोड्या खर्चांत उत्पन्न करतां येतील किंवा ते घाऊक प्रमाणावर थेट उत्पादनाच्या ठिकाणाहून पैदा करतां येतील. या संघटित व्यापाराचे दोन फायदे आहेत. एक तर मधला खर्च बराच कमी होईल आणि गिऱ्हाइकाला माल थोडा स्वस्त मिळेल. दुसरें खासगी व्यापाऱ्यांची अडवणूक यशस्वी न होता सहकारी दुकानांचा योगक्षेम अनिर्बंध चालू शकेल. कारण, घाऊक व्यापारी असोत किंवा उत्पादक धंदेवाले असोत ते खासगी व्यापाऱ्यांची कड घेऊन एकाकी सहकारी संस्थेचा कोंडमारा करूं शकतील. पण ५०-७५ संस्थांना लागणाऱ्या लाखों रुपयांच्या व्यापारावर पाणी सोडावयाला ते कधींहि तयार होणार नाहींत. सहकारी संस्था संघटित करण्याचा हा प्रश्न स्वतंत्र आहे. यासाठीं त्याचा फक्त ओझरता उल्लेख येथें करतो.

सध्याची नियंत्रित वांटपपद्धति ही राष्ट्राच्या आर्थिक व्यवस्थेंतील कृत्रिम व तात्पुरती घटना आहे. त्यामुळें आज सहकारी

संस्थांना मर्यादित कां होईना, दुकानांना लागणारा माल, धान्य अगर कापड हीं विना-सायास मिळत आहेत. पण हें कांहीं समाजजीवनाचें स्थायी स्वरूप नव्हे. आज नाहीं उद्यां बंधनें व नियंत्रणें जाणार आणि तीं गेलींच पाहिजेत. पण ग्राहक सहकारी संस्थांनीं आज जर आपली शक्ति आणि कार्यक्षमता वाढवली नाहीं तर विनियंत्रण काळांत त्यांना खाजगी व्यापाऱ्यांशीं खुल्या बाजारांत टक्कर देतां येणार नाहीं. म्हणून त्यांनीं एकाद्या मध्यवर्ती संघाच्या नेतृत्त्वाखालीं आपली संघटना उभारली पाहिजे आणि राष्ट्राच्या आर्थिक व्यवस्थेंतील आपलें स्थान बळकट पाहिजे.

### स्त्रियांचें कर्तव्य

१६. कुटुंब हें जर एक मंत्रिमंडळ मानलें तर त्यांतील कर्त्या पुरुषाला पंतप्रधान मानतां येईल आणि त्याची आई किंवा पत्नी ही अर्थ-मंत्रि असते. असें असतां या सहकाररूपी लोकशाही कारभारांत आपल्याला कुटुंब अर्थमंत्रि निष्क्रियच दिसतात, हें आश्चर्य नव्हे काय ?

( समाप्त )

---

### श्री. दाणी सल्ला घेण्यासाठी फ्रान्सला जाणार

तानसा तलावाचे कन्स्ट्रक्शन इंजिनियर श्री. पी. पी. दाणी ह्यांस मुंबई कॉर्पोरेशन तानसा तलावाचा बंधारा ज्यास्त मजबूत करण्याच्या दृष्टीनें फ्रेंच तज्ज्ञ एंजिनियर मि. ॲद्री कॉयन ह्यांचा सल्ला घेण्यासाठी पॅरीसला पाठवीत आहे. त्यांच्या दोन महिन्यांच्या प्रवासासाठी २५ हजार रुपये मंजूर झाले आहेत.

---

### उत्पादन फारसें घटणार नाहीं

" डनलॉप रबर कं. ( इंडिया ) लि. चा शहागंज येथील कारखाना एक महिना बंद पडला असला तरी वर्षाच्या उत्पादनांत फार घट पडणार नाहीं. कार्बन ब्लॅक व इतर कच्चा माल आगबोटींतून येण्याच्या मार्गावर आहे, " असें कंपनीनें जाहीर केलें आहे.

---

### कंत्राटी कामगारांनाहि बोनस दिला पाहिजे

महाराष्ट्र शुगर मिल्सच्या कंत्राटी कामगारांना बोनस मिळाला पाहिजे, असा निवाडा सुप्रीम कोर्टानें दिला आहे.

---

**भाक्रा धरणाचें नांव**—पंजाबांत भाक्रा योजनेप्रमाणें तयार होणाऱ्या धरणाचें नांव गोविंद-सागर असें ठेवण्यांत आलें आहे. ह्या धरणामुळें उत्पन्न होणाऱ्या तळ्याची लांबी ५६ मैल होइल. गुरुगोविंद हा शीख धर्मगुरूंपैकीं दहावा आहे. मोगलांपासून छळ होऊं लागल्यावर त्यानें धरणाच्या भागांतील डोंगरांचा आश्रय घेतला होता.

**उज्जैनमधील प्राचीन वेधशाळा**—उज्जैनमधील पुरातन वेधशाळा पुन्हां चालू करण्याचें ठरलें आहे. सध्यां काम करीत असलेल्या जिवाजी वेधशाळेंत वेध घेण्याचें कार्य चालू आहे. ह्या शाळेंत गोळा केलेल्या ज्योतिर्विषयक माहितीवरून प्राचीन वेधशाळा चालू करणें कितपत शक्य आहे तें अजमावण्यांत येणार आहे. तें शक्य झाल्यास जुन्या वेधशाळेला जोडून एक मध्यवर्ती ज्योतिर्विषयक संस्था स्थापन करण्यांत येईल.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. ह. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) — श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१०. |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९१,३८५ |

**एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर, B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.